नि.दि.दावा. क्र. १३/२०११.
थळू व इतर वि. नारायण व इतर.
CNR.No. MHKO150000612011

# निशाणी क्रमांक १४७ वरील आदेश.

**१.** वादींनी प्रस्तूतचा अर्ज मयत प्रतिवदी क्र. १२ चे अर्जातील वारस पटलावरती आणून आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. वादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. १२ हा दि.२४.११.२०२४ रोजी मयत झालेला आहे. अर्जातील पक्षकार त्याचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. सबब, त्यांना दाव्यात समाविष्ट करण्यासाठी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**२.** प्रतिवादींतर्फे योग्य ते आदेश होण्याची विनंती करण्यात आलेली असून प्रतिवादी क्र.१२ दि. २४.११.२०२४ रोजी मयत झाल्याची बाब नाकारलेली नाही.

**३.** वादी व प्रतिवादींच्या वकिलांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादींच्या वकिलांनी प्रस्तूत दावा हा ताबा मागणी आणि कायम मनाईचा असून प्रतिवादी क्र.१२ च्या वारसांच्या विरोधात दावा चालविण्याचा अधिकार असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादींच्या वकिलांनी योग्य ते आदेश करण्याची विनंती केलेली आहे.

**४.** वादींनी मूळ अर्जासोबत मयत प्रतिवादी क्र.१२ च्या मृत्यूपत्राची प्रत सादर केलेली नाही. प्रतिवादींनी देखील सदर बाब विवादीत केलेली नाही. मुदतीच्या कायद्याच्या परिच्छेद १२० व १२१ मधील तरतूदीप्रमाणे अर्ज मुदतीत सादर करण्यात आलेला आहे. दाव्यातील मागणीचे स्वरुप पाहता, प्रतिवादी क्र.१२ च्या कायदेशीर वारसांना पटलावरती आणणे गरजेचे आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

**१.** अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

**२.** वादींनी नियमा प्रमाणे दुरुस्ती करुन दाव्याच्या प्रती दिल्यानंतर प्रस्तावित प्रतिवादी

१२/अ व १२/ब यांना दाव्याच्या आदेशिका काढण्यात याव्यात.

३. प्रतिवादींना आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नियमा प्रमाणे दुरुस्ती करण्यास सवलत आहे.

४. वादी व प्रतिवादींनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

न्या. अ. सं. क्र. महा. ०२८९७

दिनांक – २४.०२.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते